सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरओ- ११२५ / प्र. क्र. ५१ (E-१४४६८३७ ) विशा-२, दि.०१/०९/२०२६

**विषय**:- फलटण,जि. सातारा येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर श्रीम संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणी चौकशी करण्याकरिता गठित आयोगाने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने छाननी समिती गठित करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरओ- ११२५ /प्र. क्र. ५१ (E-१४४६८३७ ) विशा-२,दि.०१/०९/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९०११२५८५२२३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Anita Pitambar Rathod
Date: 04-09-2026
18:36:44

( अनिता राठोड )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक,कायदा व सुव्यवस्था / महाराष्ट्र राज्य,मुंबई.
पोलीस अधीक्षक, सातारा.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.)
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (का.व. सु. )
कार्यासन अधिकारी, का क्र.२४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

फलटण, जि. सातारा येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर श्रीम संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणी चौकशी करण्याकरिता गठित आयोगाने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने छाननी समिती गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

**गृह विभाग**

**शासन निर्णय, क्रमांक : पीआरओ-११२५/प्र.क्र.५१(E-१४४६८३७)/विशा-२**

**मुख्य इमारत, दुसरा मजला, मंत्रालय,**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक : ०१/०९/२०२६**

**वाचा :-** १. शासन अधिसूचना, गृह विभाग, क्र. पीआरओ- ११२५/प्र.क्र.५१(E-१४४६८३७)/विशा-२, दि.०२/१२/२०२५

२. गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक : पीआरओ-११२५/प्र.क्र.५१(ई-१४४६८३७)/विशा-२, दि.११/०३/२०२६.

**प्रस्तावना :-**

दिनांक २३/१०/२०२५ रोजी मधुदीप हॉटेल, फलटण, जिल्हा सातारा येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर श्रीमती संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करण्यासाठी, शासनामार्फत संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक ०२/१२/२०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे श्री. संजय मेहरे, मा. माजी न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी आयोग गठित करण्यात आला आहे. उक्त चौकशी आयोगाने अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत चौकशी अहवाल सादर करण्याबाबत उक्त अधिसूचनेत नमूद करण्यात आले होते. तथापि, आयोगाने चौकशी पूर्ण करुन अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्याची मुदतवाढ मिळण्याची विनंती शासनास केली होती. उक्त विनंतीस अनुसरुन, आयोगास संदर्भाधीन क्र.२ येथील दि.११/०३/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.३१/०५/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार आयोगाने सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन आपला चौकशी अहवाल शासनास दि.२९/०५/२०२६ रोजी सादर केला आहे.

श्री. संजय मेहरे, मा. माजी न्यायमूर्ती यांच्या एक सदस्यीय चौकशी आयोगाने शासनास सादर केलेला अहवाल तसेच अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने करावयाच्या कार्यवाहीचा (Action Taken Report - ATR) अहवाल तयार करण्यासाठी छाननी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

दिनांक २३/१०/२०२५ रोजी मधुदीप हॉटेल, फलटण, जिल्हा सातारा येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर श्रीमती संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करण्यासाठी, श्री. संजय मेहरे, मा. माजी न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली गठित चौकशी आयोगाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. त्यानुसार आयोगाने शासनास सादर केलेला अहवाल तसेच अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने करावयाच्या कार्यवाहीचा (Action Taken Report-ATR) अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे :-

| **अ.क्र.** | **पदनाम** | **कार्यालय** | **समितीमधील पद** |
|---|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव, गृह | गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव (विशेष) | गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग, जी. टी. हॉस्पिटल कॉम्लेक्स, मुंबई. | सदस्य |
| ४ | सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, जी. टी. हॉस्पिटल कॉम्लेक्स, मुंबई. | सदस्य |
| ५ | अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ६ | पोलीस अधीक्षक, सातारा | पोलीस अधीक्षक, सातारा | सदस्य |
| ७ | सह/उप सचिव(विधि) | गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ८ | सह/उप सचिव (विशा-२) | गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

२. न्या. श्री. संजय मेहरे यांच्या एक सदस्यीय चौकशी आयोगाने काढलेल्या निष्कर्षांची व सुचविलेल्या उपाय योजनांची छाननी करुन शासनाने करावयाच्या कार्यावाहीबाबत (Action Taken Report-ATR) मा. मंत्रिमंडळासमोर व मा. विधिमंडळासमोर सादर करावयाच्या अहवालाचा मसुदा उक्त समितीने गठीत झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत तयार करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०९०११२५८५२२३२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA MOTIRAM HOLKAR

Digitally signed by RAJENDRA MOTIRAM HOLKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=ac1bf43d6978ca6d925e9240f8c09bf2f3128ad5d62a0dd7d57d2b72c9ea41f4, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=48F41D082A9DD86B54CCCF5B4C6A83A6132C3F6F06A9940BD960612800458BA7, cn=RAJENDRA MOTIRAM HOLKAR
Date: 2026.09.01 12:59:43 +05'30'

**( राजेंद्र होळकर )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव ( गृह) , गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जी. टी. हॉस्पिटल कॉम्लेक्स, मुंबई.
५. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, जी. टी. हॉस्पिटल कॉम्लेक्स, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस अधीक्षक, सातारा.
९. सह सचिव(विशा-२), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. उप सचिव(विधि), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
१२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१३. विशा २, निवडनस्ती.